पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 411 018
आरोग्य विभाग
Email – healthho@pcmcindia.gov.in Website – www.pcmcindia.gov.in
फोन नं.: - 020-67333333 विस्तारीत क्रमांक : 1336

दिनांक १६/०८/२०१९

# जाहिर निवेदन

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका परिसरातील खाजगी सेप्टीक टॅंकमधील मैलापाणी सक्शन/व्हॅक्युम एम्प्टायर वाहनाव्दारे उपसण्याचा व्यवसाय करीत आहेत. तथापी त्यांचेकडे मैलापाणी विल्हेवाटीची व्यवस्था नसल्याने महानगरपालिकेच्या जलनि:स्सारण व्यवस्थेमध्ये मैलापाणी सोडण्याची परवानगी मागतात. त्यानुसार त्यांचे संस्थेस फक्त घरगुती सेप्टीक टॅंकमधून उपसलेला मैला मनपा.च्या मैलाशुध्दीकरण केंद्रात सोडण्यास परवानगी देणे प्रस्तावित आहे.

तरी अशा सर्व संस्थांना जाहिर निवेदनाव्दारे कळविण्यात येते की, त्यांनी आपल्या संस्थेची नोंदणी आरोग्य मुख्य कार्यालय, २ रा मजला, पिंपरी- चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८ येथे करणे बंधनकारक आहे. नोंदणी न करता आणि परवानगी न घेता महानगरपालिकेच्या हद्दीत विनापरवाना मैला, नाल्यात/मॅनहोलमध्ये/मैलाशुध्दीकरण केंद्रात सोडल्याचे निदर्शनास आल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार दंडात्मक कारवाई करणेत येईल.

नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे-

१) शॉप ऍक्ट लायसन
२) पॅन कार्ड
३) सदर कामासाठी वापरण्यात येणा-या वाहनांची संख्या, त्यांचे क्रमांक, आरसी., विमा पॉलिसी, फिटनेस सर्टिफिकेट इ.
४) कामगार, वाहनचालक इ. ची संख्या, त्यांचे आधारकार्ड, ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन इ.

सबब, घरगुती सेप्टीक टॅंकमधून उपसलेला मैला मनपा.च्या मैलाशुध्दीकरण केंद्रात सोडण्याच्या कामकाजासाठी त्वरीत नोंदणी करण्यात यावी.

आयुक्त
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
आरोग्य विभाग मुख्य कार्यालय
जा. क्र. आ-२/कावि/४9८/२०१९
दिनांक १६/०८/२०१९